दै. पुण्यनगरी

# राज्यस्तरीय सल्लागार समितीच्या सदस्यपदी प्रा. डॉ. बी. आर. कतुरवार

**देगलूर/प्रतिनिधी**



अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग नेहमीच संशोधन कार्य व शैक्षणिक गुणवत्तेमध्ये प्रगतीशील राहीलेला आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकच्या कुलगुरू महोदयांनी शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रा. डॉ. बी. आर. कतुरवार यांचे योगदान लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रम तयार करण्यासाठी 'विषय तज्ञ' म्हणून राज्यस्तरीय अभ्यासक्रम समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रा. बी. आर. कतुरवार सध्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे लोकप्रशासन अभ्यास मंडळ , चेतना स्वायत महाविद्यालय मुंबई येथे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांच्या मार्गदर्शनाखाली ७ विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी प्रदान केली असुन सध्या एकूण ५ विद्यार्थी पीएच. डी. साठी संशोधन कार्य करीत आहेत.

महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाला राज्यस्तरीय समितीमध्ये काम करण्याची संधी प्राप्त झाल्याबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार,उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे,सहसचिव सुर्यकांत नारलावार,कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उनग्रतवार , जनार्दन चिद्रावार ,गंगाधर जोशी, रवींद्र द्याडे,देवेंद्र मोतेवार , चंद्रकांत नारलावार,प्राचार्य डॉ. मोहन खताळ ,उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, डॉ. एस. एम. देबडे, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर, प्रा. ज्ञानेश्वर कोकणे यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार यांचे कौतूक केले आहे.

Scanned with OKEN Scanner